# प्रेसनोट दिनांक २३/०२/२०२१

## खंडणीसाठी व्यावसायिकाचे अपहरण करुन खुन करुन पुरावा नष्ट करणे

फ्रेंडस फंड इंडीया प्रा.लि.चिटफंड कंपनीचे कार्यकारी संचालक श्री आनंद साहेबराव उणवणे, वय-४२ वर्षे, रा.नर्मदा बिल्डींग, नवीन म्हाडा बिल्डींग, मोरवाडी, पिंपरी, पुणे हे दि.०३.०२.२०२१ रोजी ऑफीसमधून घरी न आल्याने आनंद उणवणे यांचा लहान भाऊ विष्णू साहेबराव उणवणे यांनी दि.०५.०२.२०२१ रोजी मनुष्य मिसींग क्र.२६/२०२१ प्रमाणे पिंपरी पोलीस स्टेशन येथे मनुष्य मिसींग दाखल झाली होती. त्यानंतर महाड पोलीस ठाणे हददीत १ अज्ञात मृतदेह मिळुन आलेला होता. त्याप्रमाणे मयताची ओळख पटली असता, तो मृतदेह आनंद साहेबराव उणवणे यांची खात्री झाल्याने महाड एमआयडीसी पोलीस स्टेशन गु.रं.नं.१४/२०२१ भा.दं.वि. ३०२,२०१ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदरचे घटनास्थळ पिंपरी पोलीस स्टेशन हददीतील असल्याने महाड एमआयडीसी पोलीस स्टेशन गु.रं.नं.१४/२०२१ भा.दं.वि. ३०२,२०१ प्रमाणे हा गुन्हा पिंपरी पोलीस स्टेशन येथे वर्ग करुन पिंपरी पोलीस ठाणे, गुन्हा रजि. क्रं. **१०७/२०२१, भादंवि कलम ३६४, ३०२, ४११, २०१,१२०ब ,३४** हा गुन्हा दिनांक ०८/०२/२०२१ रोजी दाखल करुन तपास सुरु करण्यात आला होता.

पिंपरी पोलीस स्टेशन येथील तपास पथकाने पिंपरी, मोरवाडी, फिनोलेक्स चौक, पिंपरी गांव, काळेवाडी, रहाटणी, कोकणे चौक, पिंपळे सौदागर, जगताप डेअरी या परिसरातील **२००० सीसीटीव्ही कॅमे-यांची** सखोल तपासणी केली असता, आरोपी नामे उमेश सुधीर मोरे, वय-२८ वर्षे, रा.काळेवाडी, दिपक धर्मवीर चांडालिया, वय-३४ वर्षे रा.भोंडवे ऑर्चिड, रावेत सदर गुन्हयातील संशयीत आरोपी नामे दिपक धर्मवीर चांडालिया हे खंडणीची रक्कम असलेले पांढ-या रंगाचे पोते ॲक्टीव्हा गाडीवरुन जाताना दिसुन आले, गोपनीय बातमीदारांमार्फत सदर आरोपींची ओळख पटविण्यात आली. गोपनीय बातमीदारांमार्फत आरोपींचा ठावठिकाणा काढला असता, आरोपी नामे दिपक धर्मवीर चांडालिया, हा खरखौदा,जि.सोनीपत हरीयाना येथे असल्याची माहिती मिळाली असता, पिंपरी पोलीस स्टेशन पोहवा/३१२ कुलकर्णी व पोशि/२१२३ उमेश वानखेडे यांनी त्यांस शिताफीने दि.१४/०२/२०२१ रोजी २१.०० वा.अटक केली. सदर आरोपीची पोलीस कोठडी दरम्यान कसुन चौकशी केली असता, त्याने या गुन्हयाचा कट, पुर्वतयारी, अंमलबजावणी, गुन्हयाचा घटनाक्रम या सर्व बाबी उघड केल्या.

गोपनीय बातमीदारांमार्फत आरोपी नामे सागर दत्तात्रय पतंगे, वय-२८ वर्षे, रा.कटफळ ता.बारामती जि.पुणे यांचा या गुन्हयात सहभागी असल्याची माहिती

मिळाल्यावरुन पो.हवा.१३१२ चौगुले, पो.ना. विजय तेलेवार व पो.शि.सुहास डंगारे यांनी बारामती,इंदापुर, दौंड, फलटण परिसरात सलग ३ दिवस गोपनीय बातमीदारांकडून माहिती काढुन कसुन शोध घेतला असता, आरोपी नामे सागर दत्तात्रय पतंगे यांस अटक केली आहे. खंडणी विरोधी पथक पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, येथील पथकाने या गुन्हयाचा समांतर तपास करीत असताना सलग १५ दिवस पौड, महाड, सिल्व्हासा, दिव-दमण, पालघर, नाशिक, बावधन येथे आरोपींचा शोध घेतला असता, आरोपी नामे उमेश सुधीर मोरे व बाबु ऊर्फ तुळशीराम नथुराम पोकळे यांस दि.२०.०२.२०२१ रोजी अटक करण्यात आली आहे.

गुन्हयाच्या तपासा दरम्यान राकेश राजकुमार हेमनाणी वय-२७ वर्षे रा.मंगलदिप अपार्टमेंट, संदेश गॅस एजन्सी जवळ, तपोवन मंदीर रोडजवळ, पिंपरी, पुणे, कपिल ग्यानचंद हासवाणी, वय-३० वर्षे रा.सी-७०४, व्दारकाक्विन पार्क, रहाटणी रोड, पिंपळे सौदागर, पुणे, प्रविण नवनाथ सोनवणे वय- २२ वर्षे रा.मदनवाडी ता.इंदापुर जि.पुणे यांचा गुन्हयात सहभाग दिसुन आल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा मुख्य आरोपी प्रभू पुजारी हा अदयाप फरार असुन त्याचा तपास चालु आहे.

➢ **अटक आरोपींकडे सखोल चौकशी केली असता, सदरचा गुन्हा मयत आनंद साहेबराव उणवणे हा चिटफंड व्यावसायिक असल्याने व त्याच्याजवळ मोठयाप्रमाणात रक्कम असल्याची माहिती आरोपींना होती व ही रक्कम लुबाडण्याच्या उददेशाने आर्थिक लोभापायी आरोपींनी हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झालेले आहे.**

➢ **दि.०३.०२.२०२१ रोजी रात्रौ ०९.५० वा.सुमारास आनंद साहेबराव उणवणे याचे नवीन म्हाडा वसाहतीतील नर्मदा इमारतीच्या पार्कींग, मोरवाडी, पिंपरी, पुणे येथील पार्कींगमधून आरोपी नामे, प्रभु पुजारी, उमेश सुधीर मोरे, बाबु ऊर्फ तुळशीराम नथुराम पोकळे, सागर दत्तात्रय पतंगे, दिपक धर्मवीर चांडालिया यांनी बलेनो गाडी एमएच १४ जेए ७११५ हीचा अपहरण करण्याकरीता वापर केला होता.**

➢ **दि.०४.०२.२०२१ रोजी मयत आनंद उणवणे यांना चिटफंड ऑफीसमधील कर्मचारी यांना फोन करावयास लावुन खंडणीपोटी ४० लाख रक्कम गोळा**

करणेस भाग पाडले व आरोपी नामे उमेश सुधीर मोरे व दिपक चांडालीया हे ॲक्टीव्हा गाडीवर येवून सदरची रक्कम घेवून गेले.

- दि.०४.०२.२०२१ रोजी आरोपी यांनी खंडणीची रक्कम घेवून गेल्यानंतर आनंद साहेबराव उणवणे यांना हिजेंवडी वरुन ताम्हीनी घाट मार्गे पुढे गेल्यानंतर वरंधा ते महाड दरम्यान चालु बलेनो गाडीत दोरीने गळा आवळुन खुन केला व भोराव गांव महाड जि.रायगड येथील सावित्री नदीचे पुलावर घेवुन जावुन मयताची ओळख पटु नये म्हणून त्यास दगडाने ठेचुन पुरावा नष्ट करण्यासाठी सावित्री नदीचे पात्रात टाकुन दिले.

- सदर गुन्हयात एकुण मुद्देमाल रुपये ३९,०५,६७८/- रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

- गुन्हयात जप्त मालांचे विवरण

**आरोपी क्र.१ दिपक धर्मवीर चांडालीया कडुन जप्त मुददेमाल**

१,७०,०००/- रुपये रोख रक्कम

**आरोपी क्र. २ सागर दत्तात्रय पतंगे यांचेकडून जप्त मुद्देमाल.**

१) ४,३६,०५३/- रुपये किंमतीचा एक नेकलेस सोन्याचा खड्यासह वजन १०२.३६० ग्रॅम

२)३,६५,६७८/-रुपये किंमतीचा सोन्याच्या बांगड्या खड्यासह वजन ८५.८४० ग्रॅम

३) ३,१६,२६२/- रुपये किंमतीचा सोन्याची माळ खड्यासह वजन ७४.२४० ग्रॅम.

४) ३,०८,०८३/- रुपये किंमतीची सोन्याची चैन, वजन ७२.३२० ग्रॅम.

५) ५९,२१४/- रुपये किंमतीचा बालाजी पॅंडॉलसह वजन १३.९०० ग्रॅम

----------------

**१४,८५,२९०/- रुपये जु.वा.किं.अं.**

---

**आरोपी क्र.३ तुळशीराम ऊर्फ बाबु नथुराम पोकळे यांचेकडुन जप्त मुद्देमाल**

१) १,००,०००/-रू.रोख रक्कम, त्यात ५०० रुपये दराच्या २०० नोटा

२) १०,०००/-रू.अंदाजे किंमतीचा एक रेडमी कंपनीचा मोबाईल, त्याचा आय.एम.ई.आय. नं.८६९७७००४४८१९५३८, ८६९७७००४४८१९५४६ असा असुन त्यामध्ये सिमाकार्ड नसलेला जुवाकिंअं.

---

**आरोपी क्र.४ उमेश सुधीर मोरे यांचेकडुन जप्त मुद्देमाल**

१. १,७४,१८८/- रू.रोख रक्कम, त्यात ५०० रुपये दराच्या ३४८ नोटा, २ रुपये दराचे ६४ कॉईन, १ रुपये दराच्या ६० कॉईन

२. ०५,०००/- रू. अंदाजे किंमतीचा एक एमआय कंपनीचा मोबाईल, त्याचा आयएमईआय नं. ८६५००५०३५७१४१८२, ८६५००५३५७१४१९० असा असुन त्यामध्ये सिमाकार्ड नसलेला जुवाकिंअं.

३. १०,०००/- रु. अंदाजे किंमतीचा एक रेडमी कंपनीचा मोबाईल, त्यामध्ये सिमाकार्ड नसलेला जुवाकिंअं.

४. १,०००/- रु. अंदाजे किंमतीचा एक एमआय कंपनीचा मोबाईल, त्याचा आयएमईआय नं.८६९६५५०३६२३२१३१, ८६९६५५०३६२३२१४९ असा असुन त्यामध्ये सिमाकार्ड नसलेला जुवाकिंअं.

५. २००/- रुपये किंमतीची एक काळया रगाची गोल्ड स्टार कंपनीची कापडी सॅक त्यामध्ये वापरते कपडे असलेली जुवाकिंअ.

------------

३,००,३८८,/-रु. आरोपी क्र. ३ व ४ यांचेकडुन

---

**आरोपी क्र.५ प्रविण नवनाथ सोनवणे यांचेकडून जप्त मुद्देमाल**

१. ६,००,०००/- रुपये त्यात दोन मुदत ठेवी (फिक्स डिपॉझीट) ३ लाख रुपये किमतीच्या श्रीनाथ पतसंस्था, भिगवन, ता. इंदापुर यांचे कडील

२. ३,००,०००/- रुपये त्यात तिन मुदत ठेवी (फिक्स डिपॉझीट) १ लाख रुपये किमतीच्या एकात्मता नागरी पतसंस्था, बारामती यांचे कडील

एकुण ९,००,०००/- रुपये

**आरोपी क्र.६ राकेश राजकुमार हेमनानी यांचेकडुन जप्त मुद्देमाल**

रु. २ लाख पन्नास हजार जप्त रुपये

**आरोपी क्रं.७ कपिल ग्यानचंद हासवानी यांचेकडून जप्त मुद्देमाल**

रु. ८ लाख रुपये जप्त

**एकुण जप्त मुद्देमाल रु. ३९,०५,६७८/-**

**जप्त सोन्याचे दागीने ३५ तोळे व २१,२०,१८८/- रोख रक्कम**

**दृश्यम चित्रपटाची प्रेरणा**

आरोपींनी दृश्यम चित्रपटापासुन प्रेरणा घेवून पोलीसांची दिशाभुल करण्यासाठी दि.०५.०२.२०२१ रोजी मयत नामे आनंद साहेबराव उणवणे यांचा मोबाईल फोन देहुरोड जकात नाक्याजवळ एका चालत्या ट्रकमध्ये चालु अवस्थेत टाकुन दिला, जेणेकरुन या मोबाईलच्या मागे पोलीस मयताचा शोध घेतील.

---

➢ **तब्बल १ वर्षे गुन्हयाचे नियोजन:-**

आरोपींना मयत नामे आनंद साहेबराव उणवणे याच्या आर्थिक स्थितीची पुर्ण कल्पना होती. फेब्रुवारी २०२० पासुन आरोपी सदर गुन्हयाचे नियोजन करीत होते.

➢ **उच्चशिक्षीत आरोपी:-**

सदर गुन्हयातील आरोपी नामे उमेश सुधीर मोरे व सागर दत्तात्रय पतंगे हे अभियांत्रिकीचे विदयार्थी असुन, उच्चशिक्षीत असुनही वाममार्गाला लागल्याचे दिसुन येत आहे.

➢ **आरोपी हे सराईत गुन्हेगार असुन त्यांनी अत्यंत नियोजनपुर्वक कट रचुन कोणताही पुरावा पाठीमागे राहणार नाही, याची आरोपींनी पुरेपुर दक्षता घेतली होती.**

या गुन्हयाचा तपास मा.कृष्णप्रकाश सो।, पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड, मा.रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त, श्री सुधीर हिरेमठ, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री मंचक इप्पर, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, श्रीमती प्रेरणा कटटे, गुन्हे शाखा-२ यांचे मार्गदर्शनाखाली डॉ.सागर कवडे, सहायक पोलीस आयुक्त, पिंपरी विभाग, पिंपरी चिंचवड यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. सदर तपासकामी पिंपरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मिलींद वाघमारे, पिंपरी पोलीस स्टेशन तपास पथकाचे स.पो.नि. गणेश लोंढे, श्री सुधीर चव्हाण, स.फौ. प्रमोद भांडवलकर, स.फौ.राजु काकडे, पो.हवा. शेखर कुलकर्णी, पो.हवा. शांताराम हांडे, पो.हवा. अमोल चौगुले, पो.हवा. दत्तात्रय निकम, पो.हवा. महेश शिंदे, पो.हवा.अनिल गायकवाड, पो.हवा. विवेकानंद सपकाळे, पो.हवा.भिसे, म.पो.ना. रमिजा गोलंदाज, पोलीस नाईक शहाजी धायगुडे, पोलीस नाईक विजय तेलेवार, पो.कॉ.सुहास डंगारे, पो.कॉ.ओंकार बंड, पो.कॉ.उमेश वानखेडे तसेच खंडणी विरोधी पथकाचे श्री पोळ, पोलीस निरीक्षक, श्री शाकिर जिनेडी, पोलीस उपनिरीक्षक महेंद्र पाटील, पो.हवा.सुनिल कानगुडे, पो.ना. संदीप पाटील, पो.कॉ.शैलेश मगर, पो.कॉ.अशोक गारगोटे तसेच गुन्हेशाखा युनिट क्र.२ पोलीस निरीक्षक शैलेश गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक निलपत्रेवार, पो.हवा.वेताळ, पो.हवा. राऊत, पो.ना. राऊत, पो.ना.जमीर तांबोळी यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

